

छाया: योगेन शाह

समूह नृत्यातील एक नर्तकी म्हणून चित्रपटांत पदार्पण करणाऱ्या हेलनच्या नृत्यातील अनोख्या जादूमुळेच सलग तीस वर्षं ती रुपेरी पडद्यावर थिरकत होती.

□ इसाक मुजावर

आठवणीतील हेलन

हेलन आताशा चित्रपटात फारशी दिसत नाही. अधून मधून कधीतरी दिसते. १९९६साली *खामोशी द म्युझिकल* या चित्रपटात ती दिसली होती. तिचं हे दिसणं म्हणजे अनेक वर्षांच्या गॅपनंतर तिने चित्रपट व्यवसायात केलेलं पुनरागमन होतं. या पुनरागमनानंतर ती कितीशा चित्रपटात दिसली तर *हम दिल दे चुके है सनम* व *मोहब्बतें* या दोनच चित्रपटात. यामुळे दिसूनही तिचं हे दिसणं तसं जाणवलंच नाही. कारण हेलनचा एक जमाना असा होता की एकाच वेळी तिचे चार ते पाच चित्रपट पडद्यावर असायचे आणि वर्षाकाठी तिचे पंधरा ते सोळा चित्रपट पडद्यावर यायचे.

हेलनचं नाचणं, थिरकणं असलेले *द ट्रेन, तिसरी मंजिल, गुमनाम, कारवां* हे चित्रपट नुसते आठवा म्हणजे मी काय म्हणतोय याचा तुम्हाला प्रत्यय येईल. या चित्रपटांपैकी *द ट्रेन, गुमनाम* या चित्रपटात नंदा नायिका होती. तरीही या दोन्ही चित्रपटांचा विचार करताना हेलनचं नाचणंच या दोन्ही चित्रपटात नंदाच्या नायिकेच्या भूमिकेहून अधिक भाव खाऊन



*शरारत*मध्ये अनुराधा माथुरच्या भावस्पर्शी भूमिकेत

जातं. नंदा तशी अभिजात नर्तकी नव्हती. पण आशा पारेखच्या अभिजात नर्तकी आहे. तरीही *तिसरी मंजिल, कारवां* या चित्रपटात हेलनचं नाचणं तिच्या नायिकेवर मात करून गेलं.

*बारिश*मधील नूतन आणि *हावडा ब्रीज*मधील मधुबालाच्या नायिकेला आपण विसरू शकत नाही. या चित्रपटात 'मिस्टर जॉन, बाबा खान...' (*बारिश*) व 'मेरा नाम चिन चिन चू...' (*हावडा ब्रिज*) या गाण्यावरील नृत्यातच फक्त पडद्यावर दिसलेल्या हेलनला सुद्धा आपण नजरेआड करू शकत नाही. अनेक कलावंनाच्या गर्दीतदेखील आपलं अस्तित्व हरवू न देता ती सतत जाणवत राहिली. १९७५च्या *शोले*तील 'मेहबूबा मेहबूबा...' या गाण्यावर तिने केलेले नृत्यच याची साक्ष देईल. *शोले* मल्टी स्टार कास्ट चित्रपटांचा ट्रेंड आपल्याकडे आणणारा पहिला ठळक चित्रपट. धर्मेंद्र, संजीवकुमार, अमिताभ बच्चन, हेमामालिनी, जया भादुरी यासारख्या अनेक लोकप्रिय कलावंताची या चित्रपटात गर्दी झाली होती. या गर्दीत 'मेहबूबा मेहबूबा...' या गाण्यावरील एक नृत्यच हेलनच्या वाट्याला फक्त आले होते. 'मेहबूबा मेहबूबा...' या गाण्यावर तिने केलेल्या नृत्याचं वेगळेपण हे होतं की या गाण्यावर नाचताना हे गाणं पडद्यावर तिने गायलेलं नव्हतं. आर. डी. बर्मन तथा पंचमने गायिलेलं हे गाणं पडद्यावर जलाल आगाने अभिनीत केलं होतं. यामुळे या गाण्यातील तिचं नाचणं तसं वन सायडेड म्हणजे एकतर्फी होतं. तरीही या एकतर्फी नाचण्यात *शोले*तील मल्टी स्टारकास्टच्या गर्दीत आपलं अस्तित्व तिने हरवू दिलं नव्हतं.


शोले पडद्यावर आला तेव्हा हेलनच्या रुपेरी जीवनाचे रजतजयंती वर्ष सुरू झाले होते. १९५१ साली पडद्यावर आलेला फिल्मिस्तानचा *शबिस्तान* हेलनचा पहिला चित्रपट. तो जमाना कक्कू, शांती मधोक, हिरा सावंत यासारख्या नृत्यतारकांचा होता. कक्कूचा हात धरूनच हेलन १९५१ साली समूहनृत्यातील एक नृत्यतारका म्हणून चित्रपटात आली. त्यानंतर १९५२ पर्यंत ती आपल्या चित्रपटातील स्वतःचा चेहरा नसलेली समूहनृत्यातील एक नर्तकी म्हणूनच वावरत होती. १९५३च्या *मलिका-ए-सलोनी* या चित्रपटाने तिला समूह नृत्यातून सर्वात प्रथम बाहेर काढले आणि सोलो नृत्यात पडद्यावर सादर केलं. तिच्याबरोबरच कुमकुम, कम्मो, मिनू मुमताज, शीला वाज यासारख्या काही नृत्यतारका आपल्या चित्रपटात तेव्हा उदयाला आल्या होत्या. या नृत्यतारकांपैकी कुमकुम येथे पाहता पाहता नायिका बनली. हेलनही येथे नायिका बनली. पण कुमकुमच्या नायिकेचं यश काही तिला येथे मिळाले नाही. तरीही अभिनेत्री म्हणून मात्र ती कुमकुमहून येथे अधिक यशस्वी ठरली. १९७९ साली *लहू के दो रंग* या चित्रपटातील भूमिकेसाठी फिल्मफेअरच्या सर्वश्रेष्ठ सहाय्यक अभिनेत्रीच्या पारितोषिकाची हेलन मानकरी ठरली. या चित्रपटातील तिची भूमिका पूर्णपणे नृत्यविरहित होती. अशीच एक भूमिका तिने १९७७च्या *इमान धरम* या चित्रपटात केली होती अमिताभची नायिका बनून, पण या दोन चित्रपटांचा अपवाद वगळता नृत्यविरहित भूमिका तिच्या वाट्याला कधी आलीच नाही. कारण नृत्य उणे करून तिचा विचारदेखील कधी कोणाला करता येऊ नये अशी ती वर्षानुवर्षे नाचत आली.

हेलनसारख्या नृत्यतारकांच्या बरोबर आपल्या चित्रपटातील नायिकादेखील नाचत असतात. पण आपल्या चित्रपटातील आई मात्र कधी नाचत नाही. हेलनची आई मात्र य... अपवाद ठरली. १९८०च्या *राम बलराम* या चित्रपटातील तिची भूमिका झीनत अमानच्या आईची होती. आणि या भूमिकेत ती झीनतबरोबर नाचली होती. *खामोशी द म्युझिकल, मोहब्बतें*मधील तिच्या चरित्र भूमिकेत देखील अनेक चित्रपटांतील तिच्या गाजलेल्या नृत्यांची झलक म्हणजे तिच्या नृत्यांच्या आठवणीला देण्यात आलेला एक नवा उजाळा आहे.

तिचे नृत्य केवळ नृत्य नव्हते. हिंदी चित्रपटातील नृत्याला लागलेलं एक नवं वळण होतं. या वळणात तिच्या पदन्यासातून कितीतरी नवनवे नृत्यप्रकार हिंदी चित्रपटात आले. या नृत्यप्रकारात काही काही नृत्यप्रकार असे होते की त्यात हेलनशिवाय अन्य कोणाही नृत्यतारकेचा



“लहू के दो रंग व इमान धरम या दोन चित्रपटांचा अपवाद वगळता नृत्यविरहित भूमिका तिच्या वाट्याला कधीच आली नाही. कारण नृत्य उणे करून तिचा विचारदेखील कधी कोणाला करता येऊ नये अशी ती वर्षानुवर्षे नाचत आली.”



शरारतमध्ये अभिषेक बच्चन आणि अन्य कलाकारांसह



खामोशी द म्युझिकलमध्ये वीस वर्षांनी 'ती' पुन्हा थिरकली.



दो लफ्जों की कहानीच्या पार्टीत सहकलाकारांबरोबर.

पर्यायच नव्हता. रॉक एन रोल नृत्याचे उदाहरणच घ्या. १९५७-५८ च्या सुमारास रॉक एन रोल संगीताची लाट आपल्याकडे आली. सी. रामचंद्र व ओ. पी. नय्यर हे दोन संगीतकार एकाच वेळी या संगीतप्रकाराकडे आकर्षित झाले. सी. रामचंद्रनी या संगीतप्रकारातील 'मिस्टर जॉन, बाबा खान...' हे गाणे १९५७च्या *बारिश*साठी आशा भोसलेच्या आवाजात रेकॉर्ड केलं तर ओ. पी. नय्यरनी १९५८च्या *हावडा ब्रिज* या चित्रपटातील 'मेरा नाम चिन चिन चू...' हे गाणे गीता [illegible]च्या आवाजात. एकाच संगीतप्रकारातील ही दोन गाणी रेकॉर्ड करताना सी. रामचंद्र व ओ. पी. नय्यर यांना आशा भोसले व गीता दत्त असे दोन वेगवेगळ्या आवाजांचे पर्याय सापडले. पण ही गाणी पडद्यावर सादर करताना *बारिश*चे निर्माते-दिग्दर्शक शंकर मुखर्जी व *हावडा ब्रिज*चे निर्माते-दिग्दर्शक शक्ती सामंता यांना दोन वेगवेगळ्या नृत्यतारकांचे पर्याय काही सापडले नाहीत. दोघांनीही आपापल्या चित्रपटातील रॉक एन रोल गाण्यात हेलनलाच पडद्यावर नाचवले. आणि तिच्या या नाचातूनच हिंदी चित्रपटात रॉक एन रोल नृत्यसंगीताची सुरुवात झाली. रॉक एन रोलनंतर हिंदी चित्रपटात अ[illegible] एक पश्चिमात्य नृत्यप्रकार आला चा चा चा. हा नृत्यप्रकारदेखील हेलनच्या नाचातूनच हिंदी चित्रपटात सर्वात प्रथम खुलला. १९६८च्या *चा चा चा* या चित्रपटात आणि त्यानंतर कॅब्रेदेखील तिच्या नाचातूनच हिंदी चित्रपटात सर्वात प्रथम आला १९६९च्या *इंतकाम* या चित्रपटातील 'आ जाने जा मेरा ये हुस्न जवाँ...' या गाण्यात. या अशा गाण्यात अश्लीलता डोकावत असल्यामुळे लता मंगेशकर ही अशी गाणी सहसा गात नाहीत. तरीही *इंतकाम*मधील हे गाणे लताबाईंनी आवडीने गायले. कारण या गाण्यावर पडद्यावर हेलन नाचणार असल्यामुळे या गाण्यात अश्लीलता कोठेही निर्माण होणार नाही असा विश्वास त्यांना वाटत होता.

कॅब्रेसारख्या नृत्यप्रकाराला देखील हेलन हे सौंदर्य देऊ शकली, कारण पाश्चिमात्य संगीतावर नाचतानादेखील आपलं नृत्य तिने कधी अश्लीलतेकडे झुकू दिलं नाही. यामुळे अनेक चित्रपटांत क्लब नृत्ये करत असताना ती *जगद्गुरू शंकराचार्य*, *कीचकवध*, *भक्ती महिमा*, *नागमणी* यासारख्या धार्मिक चित्रपटातदेखील नाचली. वैजयंतीमाला, पद्मिनी यासारख्या दाक्षिणात्य नृत्यतारकांच्या आगमनानंतर हिंदी चित्रपटात अभिजात नृत्यात पारंगत असलेल्या नाचणाऱ्या नायिकांचं एक युग आलं. या युगात ज्यांचं स्थान केवळ नृत्यापुरतंच मर्यादित आहे, अशा हिंदीतील अनेक नृत्यतारका नृत्यात वैजयंतीमाला व पद्मिनी यांची कधी बरोबरी करू शकल्या नाहीत. पण हेलनने मात्र नृत्यात त्या दोघींची बरोबरी केली. *डॉ. विद्या*, *पटरानी* यासारख्या अनेक चित्रपटात ती वैजयंतीमालाबरोबर नाचली आणि *कैदी*, *सिंगापूर* यासारख्या काही चित्रपटांत पद्मिनीबरोबर. *डॉ. विद्या*मध्ये तर वैजयंतीमालाबरोबर जुगलबंदीत तिने जे नृत्यनैपुण्य दाखवलं होतं ते पाहून वैजयंतीमालानेदेखील तिच्या नृत्यकौशल्याला दाद दिली होती. *झनक झनक पायल बाजे*च्या यशानंतर *गोपीकृष्ण*ची नायकाची भूमिका असलेल्या नृत्यप्रधान चित्रपटांची एक लाट आली होती. या लाटेत १९५९च्या *नाचघर* या चित्रपटात हेलन गोपीकृष्णची नायिका बनून त्यांच्याबरोबर नाचली होती. *नाचघर*मधील भूमिका हेलनच्या नायिकेच्या भूमिकेची सुरुवात होती. ती जॉय मुखर्जी (*हम हिंदुस्तानी*), आजाद (*एलिफंट क्वीन*), शहा आगा (*मिस चालबाज*), रंजन (*हवा महल*), महिपाल (*बीन का जादू*), जयराज (*कॅप्टन रोस*), अजित (*काबलीखान*), दारासिंह (*आया तुफान*), चंद्रशेखर (*चा चा चा*), अरुण सरनाईक (*लेडी कीलर*), रंधवा (*यह खून रंग लायेगा*), ओ. पी. रल्हन (*हलचल*), मेहमूद (*जीनी और जॉनी*) यासारख्या नायकांच्याबरोबर भूमिका करत आपल्या रुपेरी जीवनात अमिताभ बच्चन (*इमान धरम*), विनोद खन्ना (*लहू के दो रंग*) पर्यंत पोचली आणि अमिताभ, विनोद खन्ना यांच्याबरोबरच भूमिका करताना ती आपल्या वयाहून लहान झाली.

यामुळे १९५१ ते १९८० पर्यंत सलग तीस एक वर्षे तिच्या रुपेरी जीवनाची वाटचाल येथे अखंडपणे चालू राहिली. १९८०च्या सुमारास हेलनचा अस्त येथे सुरू झाला. तिचा अस्त होत असतानाच पद्मा खन्ना, लीना दास, कल्पना अय्यर यासारख्या नृत्यतारका येथे उदयाला आल्या. पण या नृत्यतारकांपैकी कोणाही नृत्यतारकेला हेलनची जागा येथे घेता आलेली नाही. कारण हेलनसारखी नृत्यतारका वारंवार जन्माला येत नसते. युगायुगातून एकदाच जन्माला येत असते. आणि आपलं एक युग निर्माण करून वर्षानुवर्षे आठवणीत मागे उरत असते. यामुळेच अधून मधून *खामोशी द म्युझिकल*, *मोहब्बतें* यासारख्या चित्रपटात ती दिसते तेव्हा तिच्या अनेक आठवणी चाळवल्या जातात. आणि आताशा ती नाचत नसली तरी अनेक चित्रपटात तिने केलेल्या नृत्यांच्या आठवणी चाळवल्या जातात. आणि आता लवकरच प्रदर्शित होणाऱ्या *शरारत*मध्ये ती एका अनोख्या भूमिकेत तुम्हाला पाहायला मिळेल. ●